0 1 MAR 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ७५७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्याच्या हिवाळी सत्रातील आजअखेर झालेल्या ७५७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. शनिवारी एमबीए, एम. एस्सी., एम. कॉम. या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने झाल्या.

परीक्षेला १०५ विद्यार्थी उपस्थित होते. दि. २८ रोजी पीजी डिप्लोमा इन इंडस्ट्रीयल सेफ्टी या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 1 MAR 2026 सकाळ



# शिक्षणशास्त्र अधिविभागात पाचपासून राष्ट्रीय परिसंवाद

**कोल्हापूर, ता. २८ :** शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागात पाच व सहा मार्चला राष्ट्रीय परिसंवाद होत आहे. 'एम्ब्रेसिंग डायव्हर्सिटी : रिइमेजिनिंग इन्क्लुसिव एज्युकेशन इन अ ग्लोबलाइज्ड वर्ल्ड' हा त्याचा मुख्य विषय आहे. सकाळी साडेदहा वाजता त्याचे उद्‌घाटन होईल. प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी यांनी परिसंवादात सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. चेतना सोनकांबळे व डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी केले आहे.

01 MAR 2026

जनप्रवास

# ‘विज्ञानातील महिला’ विषयावर विद्यापीठात ग्रंथप्रदर्शन

**जनप्रवास : कोल्हापूर**

विकसित भारताच्या उभारणीमध्ये विज्ञानाची भूमिका महत्त्वाची राहणार असून वैज्ञानिक क्षेत्रातील महिलांची संख्या वाढणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने या क्षेत्रात आजपर्यंत महिलांनी बजावलेल्या कार्याची माहिती होण्यासाठी त्याविषयीच्या पुस्तकांचे वाचन अगत्याचे आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय साळी यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे विज्ञानातील महिला'या विषयावरील विशेष ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले. त्याच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना ते बोलत होते.

यंदाच्या राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त केंद्र सरकारनेविज्ञान क्षेत्रातील महिलाःविकसित भारत निर्मितीमध्ये योगदान'ही मध्यवर्ती संकल्पना निश्चित केली आहे. त्या अनुसरून विद्यापीठाच्या ग्रंथालयामधील निवडक, दुर्मिळ आणि महत्त्वाच्या विज्ञानविषयक पुस्तकांचे प्रदर्शन आज आयोजित करण्यात आले. डॉ. जयंत नारळीकर, निरंजन घाटे, डॉ. बाळ फोंडके, अच्युत गोडबोले, माधव गाडगीळ, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, सुरेश कुमार जिन्दल, कॅप्टन एस. शेषाद्री अराधिका शर्मा, मीरा सिमसरकर इत्यादी वैज्ञानिक, विज्ञान लेखकांची पुस्तके प्रदर्शनात मांडण्यात आली. यामध्ये वैज्ञानिक संकल्पनांचे विश्लेषण करणारी, विज्ञान व वैज्ञानिकांचा इतिहास, जीवनकार्य, चरित्रे व आत्मचरित्रे, माहितीपर अशी एकूण ११६ पुस्तके समाविष्ट होती. शिवाजी विद्यापीठास सादर करण्यात आलेले महिला संशोधकांचे शोधप्रबंध तसेच महिला वैज्ञानिकांची माहिती देणाऱ्या पुस्तकांचे स्वतंत्र दालनही होते. या प्रदर्शनाला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील, उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर, सहाय्यक ग्रंथपाल शिवराज थोरात, राजेंद्र खामकर यांच्यासह ग्रंथालयीन कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे विज्ञानातील महिला'या विषयावरील विशेष ग्रंथप्रदर्शनाची पाहणी करताना डॉ. अजय साळी, धनंजय सुतार आदी.**

0 1 MAR 2026

जनप्रवास

# दृष्टिदिव्यांगांनी स्पर्श, गंध, चवीतून अनुभवले वनस्पतीजगत



शिवाजी विद्यापीठाच्या सुगम्यविज्ञान उपक्रमांतर्गत स्पर्श, गंध व चवीतून वनस्पतींची ओळख करून घेताना दृष्टीदिव्यांग विद्यार्थी.

## शिवाजी विद्यापीठाचा विज्ञान दिनानिमित्त 'सुगम्यविज्ञान' उपक्रम

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाने यंदाच्या राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दृष्टीदिव्यांग विद्यार्थ्यांसाठी 'बीजारोपण ते उत्पादन' या विषयावर विशेष 'सुगम्यविज्ञान'हा उपक्रम आयोजित केला. याअंतर्गत स्पर्श, गंध, आकार आणि चवीच्या माध्यमातून विविध वनस्पती ओळखण्याचे तंत्र या विद्यार्थ्यांना आत्मसात करता आले.

राष्ट्रीय विज्ञान दिन २०२६ अंतर्गत शिवाजी विद्यापीठात युजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने दृष्टि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अनुभवाधारित विज्ञान उपक्रम राबविला. बीजरोपणापासून उत्पादनापर्यंतच्या प्रक्रियेचे प्रात्यक्षिक सादर करत वनस्पतींची वाढ, बियांची रचना, अंकुरण प्रक्रिया, रोपांची निगा आणि शेतीतील उत्पादन याबाबत माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना विविध फळे, मसाले, औषधी व सुगंधी वनस्पतींचे स्पर्श, गंध तसेच चव यांच्या माध्यमातून ओळख करून दिली. या उपक्रमात सुशिलाबाई घोडावत अंध विद्यालय (सांगली-मिरज), ज्ञान प्रबोधन भवन संचलित अंध विद्यालय कोल्हापूर आणि सद्गुरु धोंडीराज निवासी अंध विद्यालय पलूस येथील सुमारे शंभर दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. माधुरी वाळवेकर, संयोजक डॉ. एस. आर. यन्कंची, युजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसेबिलिटीज आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. वर्षा जाधव आणि एस. ए. पाटील यांनी उपक्रमाचे नियोजन केले.

01 MAR 2026
पुण्यनगरी

# 'शिक्षणशास्त्र'मध्ये ५ रोजी परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या वतीने दि. ५ व ६ मार्च रोजी दोनदिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन केले आहे. 'एम्ब्रेसिंग डायव्हर्सिटी : रिइमेजिनिंग इन्क्लुसिव एज्युकेशन इन अ ग्लोबलाईज्ड वर्ल्ड' हा मुख्य विषय आहे. याचे उद्‌घाटन दि. ५ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता शिक्षणशास्त्र सभागृहात होत आहे. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, प्रमुख अतिथी म्हणून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. संजीव सोनवणे, तर प्रमुख उपस्थिती आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. अजय साळी यांच्या हस्ते उद्‌घाटन होणार आहे. प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी यांनी परिसंवादात सहभागी व्हावे, असे आवाहन अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी केले.

0 1 MAR 202
जनप्रवास

# विद्यापीठात दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या वतीने ५ व ६ दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन केले आहे. "एम्ब्रेसिंग डायव्हर्सिटीः रीइमेजिनिंग इन्क्लुसिव एज्युकेशन इन अ ग्लोबलाइज्ड वर्ल्ड" हा मुख्य विषय आहे. परिसंवादाचे उदघाटन ५ मार्च रोजी होणार आहे. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, प्रमुख अतिथी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. संजीव सोनवणे व प्रमुख उपस्थिती आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा.डॉ. अजय साळी यांच्या हस्ते उदघाटन आहे.

0 1 MAR 2026
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात ५ रोजी राष्ट्रीय परिसंवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या वतीने गुरूवार दि. ५ व ६ रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. परिसंवादाचे उदघाटन गुरुवारी सकाळी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र सभागृहात आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. अजय साळी यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी प्र–कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव तर प्रमुख अतिथी म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. संजीव सोनवणे उपस्थित राहणार आहेत.

0 1 MAR 2026
पुण्यनगरी

# डॉ. जत्राटकर यांच्या पुस्तकाला पुरस्कार



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी तथा लेखक डॉ. आलोक जत्राटकर यांच्या 'ब्लॅक, व्हाईट अन ग्रे' या ललित लेखसंग्रहाला महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे) यांच्या ईश्वरपूर शाखेच्या वतीने देण्यात येणारा लोकनेते राजारामबापू पाटील उत्कृष्ट वाङ्मय-२०२५ पुरस्कार जाहीर झाला. राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा. शामराव पाटील, शाखेचे अध्यक्ष प्रा. दीपक स्वामी यांनी पुरस्काराची घोषणा केली. डॉ. जत्राटकर यांची 'निखळ जागर संवेदनांचा', 'समाज आणि माध्यमं' ही पुस्तकेही प्रकाशित आहेत. त्यांना दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूर, शब्दांगण साहित्यिक व सांस्कृतिक व्यासपीठ, मिरज आणि ध्यास फाऊंडेशन, पलूस आदी संस्थांचे प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
01 MAR 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. जत्राटकर यांच्या पुस्तकाला राजारामबापू पाटील साहित्य पुरस्कार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी तथा लेखक डॉ. आलोक जत्राटकर यांच्या 'ब्लॅक, व्हाईट अन् ग्रे' या ललित लेखसंग्रहाला महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे) यांच्या ईश्वरपूर शाखेच्या वतीने देण्यात येणारा लोकनेते राजारामबापू पाटील उत्कृष्ट वाङ्मय-२०२५ पुरस्कार जाहीर झाला आहे. राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा. शामराव पाटील, शाखेचे अध्यक्ष प्रा. दीपक स्वामी यांनी नुकतीच पुरस्कारांची घोषणा केली.

डॉ. जत्राटकर यांचा 'ब्लॅक, व्हाईट अन् ग्रे' हा ललित लेखसंग्रह कोल्हापूरच्या भाग्यश्री प्रकाशनातर्फे प्रकाशित करण्यात आला असून यामध्ये मानवतावादाच्या सूत्रामध्ये गुंफलेल्या निवडक ३० लेखांचा समावेश आहे. व्यापक जागतिक समुदायामध्ये मानवी मूल्यांच्या प्रतिष्ठापनेचा आग्रह या लेखनामागे आहे. ज्येष्ठ समीक्षक डॉ. रणधीर शिंदे यांची प्रस्तावना पुस्तकाला लाभली आहे.



डॉ. जत्राटकर यांची 'निखळ: जागर संवेदनांचा', 'समाज आणि माध्यमं' ही पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत. त्यांना दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर, शब्दांगण साहित्यिक व सांस्कृतिक व्यासपीठ, मिरज आणि ध्यास फाऊंडेशन, पलूस आदी संस्थांचे प्रतिष्ठेचे पुरस्कारही लाभले आहेत.

01 MAR 2026 सकाळ

# डॉ. जत्राटकर यांच्या पुस्तकाला पुरस्कार



डॉ. जत्राटकर

कोल्हापूर : येथील शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्या 'ब्लॅक, व्हाईट अन् ग्रे' ललित लेखसंग्रहाला महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या (पुणे) ईश्वरपूर शाखेतर्फे देण्यात येणारा 'लोकनेते राजारामबापू पाटील उत्कृष्ट वाङ्मय २०२५' पुरस्कार जाहीर झाला. राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा. शामराव पाटील, शाखेचे अध्यक्ष प्रा. दीपक स्वामी यांनी नुकतीच पुरस्कारांची घोषणा केली. डॉ. जत्राटकर यांचा 'ब्लॅक, व्हाईट अन् ग्रे' या ललित लेखसंग्रहात मानवतावादाच्या सूत्रामध्ये गुंफलेल्या निवडक ३० लेखांचा समावेश आहे. व्यापक जागतिक समुदायात मानवी मूल्यांच्या प्रतिष्ठापनेचा आग्रह लेखनामागे आहे. ज्येष्ठ समीक्षक डॉ. रणधीर शिंदे यांची प्रस्तावना पुस्तकाला आहे. यापूर्वी त्यांची 'निखळ : जागर संवेदनांचा', 'समाज आणि माध्यमं' ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

0 1 MAR 2026
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी अधिसूचना २०२६-२०२७

शिवाजी विद्यापीठामधील विविध अधिविभागात व संलग्नित महाविद्यालयात शिकवले जाणारे पदवी / पदव्युत्तर/ एकात्मिक व आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता पात्र विद्यार्थ्यांकडून **दि.०१/०३/२०२६ ते दि.२७/०४/२०२६ पर्यंत प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. (सदरची प्रवेश परीक्षा ही दिनांक १२/०५/२०२६ ते दिनांक १५/०५/२०२६ या कालावधीत घेण्यात येईल.)**

**तसेच प्रवेश परिक्षेव्यतिरिक्त अभ्यासक्रमांसाठी दि.०१/०३/२०२६ ते दि.३१/०५/२०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागणी करण्यात येत आहेत. शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या सीमा भागातील विद्यार्थ्यांना विशेष सवलत देण्यात येत आहे.** उपरोक्त अभ्यासक्रमांच्या प्रवेशासंदर्भात सविस्तर तपशील **(Admission Notification)** विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून विद्यार्थ्यांनी सदर संकेतस्थळास भेट द्यावी. तसेच प्रवेशासंदर्भात अद्ययावत माहिती वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ परिसरातील आरोग्यदायी वातावरणात दर्जेदार शिक्षण घेण्याची तसेच विद्यापीठाच्या विविध उपक्रमात भाग घेण्याच्या संधीसाठी खालील लिंकवरून अभ्यासक्रम तसेच प्रवेश परीक्षेची माहिती घेवून तात्काळ प्रवेश अर्ज भरावेत.

**https://www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information**

ठिकाण : कोल्हापूर.
दि. ०१/०३/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

0 1 MAR 2026
लोकमत

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी अधिसूचना २०२६-२०२७

शिवाजी विद्यापीठामधील विविध अधिविभागात व संलग्नित महाविद्यालयात शिकवले जाणारे पदवी / पदव्युत्तर/ एकात्मिक व आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता पात्र विद्यार्थ्यांकडून **दि.०१/०३/२०२६ ते दि.२७/०४/२०२६ पर्यंत प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. (सदरची प्रवेश परीक्षा ही दिनांक १२/०५/२०२६ ते दिनांक १५/०५/२०२६ या कालावधीत घेण्यात येईल.)**

**तसेच प्रवेश परिक्षेव्यतिरिक्त अभ्यासक्रमांसाठी** दि.०१/०३/२०२६ ते दि.३१/०५/२०२६ पर्यंत **ऑनलाईन अर्ज मागणी करण्यात येत आहेत. शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या सीमा भागातील विद्यार्थ्यांना विशेष सवलत देण्यात येत आहे.** उपरोक्त अभ्यासक्रमांच्या प्रवेशासंदर्भात सविस्तर तपशील **(Admission Notification)** विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून विद्यार्थ्यांनी सदर संकेतस्थळास भेट द्यावी. तसेच प्रवेशासंदर्भात अद्ययावत माहिती वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ परिसरातील आरोग्यदायी वातावरणात दर्जेदार शिक्षण घेण्याची तसेच विद्यापीठाच्या विविध उपक्रमात भाग घेण्याच्या संधीसाठी खालील लिंकवरून अभ्यासक्रम तसेच प्रवेश परीक्षेची माहिती घेवून तात्काळ प्रवेश अर्ज भरावेत.

**https://www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information**

**ठिकाण : कोल्हापूर.**
**दि. ०१/०३/२०२६**

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
**कुलसचिव**

01 MAR 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी अधिसूचना २०२६-२०२७

शिवाजी विद्यापीठामधील विविध अधिविभागात व संलग्नित महाविद्यालयात शिकवले जाणारे पदवी / पदव्युत्तर/ एकात्मिक व आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांच्या. प्रवेशाकरीता पात्र विद्यार्थ्यांकडून **दि.०१/०३/२०२६ ते दि.२७/०४/२०२६ पर्यंत प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. (सदरची प्रवेश परीक्षा ही दिनांक १२/०५/२०२६ ते दिनांक १५/०५/२०२६ या कालावधीत घेण्यात येईल.)**

**तसेच प्रवेश परिक्षेव्यतिरिक्त अभ्यासक्रमांसाठी दि.०१/०३/२०२६ ते दि.३१/०५/२०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागणी करण्यात येत आहेत. शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या सीमा भागातील विद्यार्थ्यांना विशेष सवलत देण्यात येत आहे.** उपरोक्त अभ्यासक्रमांच्या प्रवेशासंदर्भात सविस्तर तपशील **(Admission Notification)** विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून विद्यार्थ्यांनी सदर संकेतस्थळास भेट द्यावी. तसेच प्रवेशासंदर्भात अद्ययावत माहिती वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ परिसरातील आरोग्यदायी वातावरणात दर्जेदार शिक्षण घेण्याची तसेच विद्यापीठाच्या विविध उपक्रमात भाग घेण्याच्या संधीसाठी खालील लिंकवरून अभ्यासक्रम तसेच प्रवेश परीक्षेची माहिती घेवून तात्काळ प्रवेश अर्ज भरावेत.

**https://www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information**

ठिकाण : कोल्हापूर.
दि. ०१/०३/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

0 1 MAR 2026

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी अधिसूचना २०२६-२०२७

शिवाजी विद्यापीठामधील विविध अधिविभागात व संलग्नित महाविद्यालयात शिकवले जाणारे पदवी / पदव्युत्तर/ एकात्मिक व आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता पात्र विद्यार्थ्यांकडून **दि.०१/०३/२०२६ ते दि.२७/०४/२०२६ पर्यंत प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. (सदरची प्रवेश परीक्षा ही दिनांक १२/०५/२०२६ ते दिनांक १५/०५/२०२६ या कालावधीत घेण्यात येईल.)**

**तसेच प्रवेश परिक्षेव्यतिरिक्त अभ्यासक्रमांसाठी दि.०१/०३/२०२६ ते दि.३१/०५/२०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागणी करण्यात येत आहेत. शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या सीमा भागातील विद्यार्थ्यांना विशेष सवलत देण्यात येत आहे.** उपरोक्त अभ्यासक्रमांच्या प्रवेशासंदर्भात सविस्तर तपशील **(Admission Notification)** विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून विद्यार्थ्यांनी सदर संकेतस्थळास भेट द्यावी. तसेच प्रवेशासंदर्भात अद्ययावत माहिती वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ परिसरातील आरोग्यदायी वातावरणात दर्जेदार शिक्षण घेण्याची तसेच विद्यापीठाच्या विविध उपक्रमात भाग घेण्याच्या संधीसाठी खालील लिंकवरून अभ्यासक्रम तसेच प्रवेश परीक्षेची माहिती घेवून तात्काळ प्रवेश अर्ज भरावेत.

**https://www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information**

**ठिकाण : कोल्हापूर.** **डॉ. व्ही. एन. शिंदे**
**दि. ०१/०३/२०२६** **कुलसचिव**

01 MAR 2026 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांनी आधुनिक ज्ञान आत्मसात करावे

## डॉ. अपर्णा कलावते : विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिन कार्यक्रमाचा समारोप

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : विकसित भारताच्या जडणघडणीत महिलांचे मोलाचे योगदान राहणार असून, त्यासाठी त्यांनी संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता यांसह विज्ञानाच्या क्षेत्रातील आधुनिक ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन झुऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया (पुणे) येथील वरिष्ठ संशोधक डॉ. अपर्णा कलावते यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात झालेल्या तीनदिवसीय राष्ट्रीय विज्ञान दिन कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या, तर विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, डॉ. एस. आर. यंन्कंची उपस्थित होते.



राष्ट्रीय विज्ञान दिन कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी बोलताना डॉ. अपर्णा कलावते.

डॉ. कलावते म्हणाल्या, ''भारतीय विज्ञान क्षेत्राला जानकी अम्मल, शकुंतला देवी, रेशेल कार्सन, असीमा चटर्जी, डॉ. इंदिरा हिंदुजा अशा अनेक प्रभावी महिला संशोधक, शास्त्रज्ञांनी योगदान देऊन समृद्ध बनविले आहे. विपरित परिस्थितीशी दोन हात करत त्यांनी संशोधनाची वाट चोखाळली. त्यांचा आदर्श ठेवून आजच्या युवतींनी विज्ञान संशोधनाच्या क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध करण्यास सज्ज व्हायला हवे. महिलांचे सर्वंकष योगदान लाभले तरच भारत खऱ्या अर्थाने विकसित होईल. म्हणून महिलांनी कोणत्याही क्षेत्रात कारकीर्द करत असताना आणि वावरत असताना संकोच बाळगू नये.

डॉ. जाधव म्हणाल्या, ''विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व गणित क्षेत्रांत महिलांनी सक्रिय सहभाग नोंदवून संशोधन व नवोपक्रमात आघाडी घेण्यासाठी सध्या सुवर्णकाळ आहे. या संधीचा विद्यार्थिनींनी लाभ घ्यायला हवा. विकसित भारताला अपेक्षित विज्ञान क्षेत्राच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीतील योगदान देण्यासाठी त्यांनी सिद्ध व्हावे.''

या वेळी विविध स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रांचे वितरण केले. डॉ. सुनील गायकवाड यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. विज्ञान दिन उपक्रमाच्या समन्वयक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी उपक्रमाचा अहवाल सादर केला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. नितीन कांबळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 1 MAR 2026 तरुण भारत

ज्येष्ठ संशोधक डॉ. अपर्णा कलावते : विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिन उपक्रमांची सांगता

# महिलांच्या सर्वंकष योगदानाची गरज



कोल्हापूर : राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या सांगता समारंभात बोलताना डॉ. अपर्णा कलावते. मंचावर प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. राजाराम गुरव आणि डॉ. एस. आर. यन्कंची.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विकसित भारताच्या जडणघडणीमध्ये महिलांचे मोलाचे योगदान राहणार असून त्यासाठी त्यांनी संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता यांसह विज्ञानाच्या क्षेत्रातील आधुनिक ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. महिलांचे सर्वंकष योगदान लाभले तरच भारत खऱ्या अर्थाने विकसित होईल, असे प्रतिपादन झुऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया (पुणे) येथील वरिष्ठ संशोधक डॉ. अपर्णा कलावते यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित तीन दिवसीय राष्ट्रीय विज्ञान दिन कार्यक्रमाच्या सांगता समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या, तर विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, डॉ. एस.आर. यन्कंची उपस्थित होते.

डॉ. अपर्णा म्हणाल्या, भारतीय विज्ञान क्षेत्राला जानकी अम्मल, शकुंतला देवी, रेशेल कार्सन, असीमा चटर्जी, डॉ. इंदिरा हिंदुजा इत्यादी अनेक प्रभावी महिला संशोधक, शास्त्रज्ञांनी योगदान देऊन समृद्ध बनविले आहे. विपरित परिस्थितीशी दोन हात करीत त्यांनी आपल्या संशोधनाची वाट चोखाळली. त्यांचा आदर्श ठेवून आजच्या युवतींनी विज्ञान संशोधनाच्या क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करण्यास सज्ज व्हायला हवे.

> विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व गणित या क्षेत्रांत सुवर्णकाळ आहे. या संधीचा विद्यार्थिनींनी लाभ घ्यायला हवा. विकसित भारताला अपेक्षित विज्ञान क्षेत्राच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीतील योगदान देण्यासाठी त्यांनी सिद्ध व्हावे.
> **- डॉ. ज्योती जाधव,**
> प्र–कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ.

केंद्र सरकारने यंदाच्या राष्ट्रीय विज्ञान दिनाची मध्यवर्ती संकल्पनाच 'विज्ञान क्षेत्रातील महिला: विकसित भारतासाठी प्रेरक शक्ती" अशी ठेवली आहे. महिलांनी कोणत्याही क्षेत्रात कारकीर्द करीत असताना आणि वावरत असताना संकोच बाळगू नये, आत्मविश्वासाने पुढे यायला हवे. उद्दिष्टे निश्चित करून ध्येयवादी वृत्तीने वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले.

विविध स्पर्धांतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. डॉ. सुनील गायकवाड यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. माधुरी वाळवेकर यांनी उपक्रमाचा आढावा घेतला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नितीन कांबळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
0 1 MAR 2026 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिन उपक्रमाची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विकसित भारताच्या जडणघडणीमध्ये महिलांचे मोलाचे योगदान राहणार असून, त्यासाठी त्यांनी संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता यासह विज्ञानाच्या क्षेत्रातील आधुनिक ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन झुऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया (पुणे) येथील वरिष्ठ संशोधक डॉ. अपर्णा कलावते यांनी शनिवारी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित तीनदिवसीय राष्ट्रीय विज्ञान दिन कार्यक्रमाच्या सांगता समारंभात त्या बोलत होत्या. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, डॉ. एस. आर. यंन्कंची यावेळी उपस्थित होते.

डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व गणित या क्षेत्रांत महिलांनी सक्रिय सहभाग नोंदवून संशोधन व नवोपक्रमात आघाडी घेण्यासाठी सध्या सुवर्णकाळ आहे. प्रगतीत मोलाचा वाटा उचलावा. यावेळी विविध स्पर्धांतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

डॉ. सुनील गायकवाड यांनी परिचय करून दिला. समन्वयक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी उपक्रमाचा अहवाल सादर केला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नितीन कांबळे यांनी आभार मानले.

0 1 MAR 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वैज्ञानिक क्षेत्रात महिलांची संख्या वाढावी

## डॉ. साळी : विज्ञान दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात ग्रंथ प्रदर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : विकसित भारताच्या उभारणीत विज्ञानाची भूमिका महत्त्वाची राहणार असून, वैज्ञानिक क्षेत्रातील महिलांची संख्या वाढणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय साळी यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे 'विज्ञानातील महिला' विषयावरील विशेष ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



कोल्हापूर : विज्ञान दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात शनिवारी भरविलेले ग्रंथ प्रदर्शन.

यंदाच्या राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त केंद्र सरकारने 'विज्ञान क्षेत्रातील महिला : विकसित भारत निर्मितीमध्ये योगदान' ही मध्यवर्ती संकल्पना निश्चित केली आहे. त्या अनुसरून विद्यापीठाच्या ग्रंथालयामधील निवडक, दुर्मीळ आणि महत्त्वाच्या विज्ञानविषयक पुस्तकांचे प्रदर्शन आज झाले. डॉ. जयंत नारळीकर, निरंजन घाटे, डॉ. बाळ फोंडके, अच्युत गोडबोले, माधव गाडगीळ, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, सुरेशकुमार जिन्दल, कॅप्टन एस. शेषाद्री, अराधिका शर्मा, मीरा सिमसरकर या वैज्ञानिक, विज्ञान लेखकांची पुस्तके प्रदर्शनात मांडण्यात आली. यात वैज्ञानिक संकल्पनांचे विश्लेषण करणारी, विज्ञान व वैज्ञानिकांचा इतिहास, जीवनकार्य, चरित्रे व आत्मचरित्रे, माहितीपर अशी एकूण ११६ पुस्तकांचा समावेश होता. शिवाजी विद्यापीठास सादर केलेले महिला संशोधकांचे शोधप्रबंध व महिला वैज्ञानिकांची माहिती देणाऱ्या पुस्तकांचे स्वतंत्र दालन होते.

मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील, उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर, सहायक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात, डॉ. राजेंद्र खामकर उपस्थित होते.

01 MAR 2026
पुण्यनगरी

# वैज्ञानिक क्षेत्रातील महिला वाढणे आवश्यक : डॉ. साळी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विकसित भारताच्या उभारणीमध्ये विज्ञानाची भूमिका महत्त्वाची राहणार असून, वैज्ञानिक क्षेत्रातील महिलांची संख्या वाढणे अत्यावश्यक आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय साळी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे 'विज्ञानातील महिला' या विषयावरील विशेष ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. यंदाच्या राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त केंद्र सरकारने 'विज्ञान क्षेत्रातील महिला : विकसित भारत निर्मितीमध्ये योगदान' ही मध्यवर्ती संकल्पना निश्चित केली असून, त्यानुसार हे प्रदर्शन झाले. यावेळी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील, उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर, सहायक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात, डॉ. राजेंद्र खामकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 MAR 2026 सकाळ,

# ज्याचे मन स्वच्छ त्याचा आवाजही प्रभावी

## तुषार भद्रे : शिवाजी विद्यापीठात 'आवाज जोपासना' कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : 'प्रत्येक माणसात एक उत्तम कलाकार दडलेला असतो, त्याला बाहेर काढणे हेच प्रशिक्षकाचे खरे काम आहे, आवाज फक्त चांगला असून, चालत नाही, तर तो समोरच्याला ऐकत राहावासा वाटणे ही खरी गुणवत्ता आहे, ज्याचे मन स्वच्छ आणि स्वीकारार्ह असते, त्याचा आवाजही तितकाच प्रभावी असतो. असूया आणि द्वेषासारख्या भावना आतला आवाज खराब करतात,' असे सातारा येथील ज्येष्ठ नाट्यदिग्दर्शक, लेखक आणि आवाज साधना तज्ज्ञ तुषार भद्रे यांनी मार्गदर्शन केले.

शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'आवाज जोपासना' ही विशेष नाट्य कार्यशाळा झाली. मोकळा श्वास आणि लवचिक आवाज म्हणजे उत्तम अभिनय. श्वास घेणे आणि श्वासाचा (वाचेसाठी) वापर करणे यातील फरक त्यांनी स्पष्ट केला. आनंद, प्रेम, भीती या प्रत्येक भावनेनुसार श्वासाची गती बदलते, याचे प्रात्यक्षिक त्यांनी दिले. आंघोळ करताना किंवा केस विंचरतानाही आवाज साधना कशी करता येते, हे त्यांनी सोप्या भाषेत सांगितले.



कोल्हापूर : 'आवाज जोपासना' नाट्य कार्यशाळेत माहिती देताना तुषार भद्रे.

हमिंग, स्वरांचा अभ्यास, ओंकार साधना, बाराखडी आणि संस्कृत श्लोकांच्या माध्यमातून आवाजाची गरिमा कशी वाढवावी, याचे प्रशिक्षण दिले.

श्री. भद्रे यांनी विद्यार्थ्यांनी पोटातून, छातीतून आणि कंठातून आवाज कसा लावावा, तसेच श्वास घेताना बोटांच्या मुद्रांचा वापर कसा होतो, याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. तसेच नाटकात काम करताना आवश्यक असणारे 'स्विच ऑन-स्विच ऑफ' तंत्र आणि 'कॅरेक्टर बँक' तयार करण्यासाठी निरीक्षणाचे महत्त्व यावरही चर्चा झाली.

प्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी प्रास्ताविक केले. किरणसिंह चव्हाण यांनी परिचय करून दिला. डॉ. संजय तोडकर, रविदर्शन कुलकर्णी, विकास कांबळे, राज पाटील, अतुल परीट, मल्हार जोशी यांचा सहभाग होता. जयसिंग पाटील, सागर अध्यापक, प्रमोद कुलकर्णी, उज्ज्वला खांडेकर, डॉ. अनमोल कोठाडिया उपस्थित होते.

0 1 MAR 2026
तरूण भारत

# वैज्ञानिक क्षेत्रातही महिलांनी पुढे यावे



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ग्रंथ प्रदर्शनाला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

■ **डॉ. अजय साळी; विद्यापीठात ग्रंथ प्रदर्शन**

प्रतिनिधी
कोल्हापूर

विकसित भारताच्या उभारणीमध्ये विज्ञानाची भूमिका महत्त्वाची असून वैज्ञानिक क्षेत्रातील महिलांची संख्या वाढणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय साळी यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे 'विज्ञानातील महिला" या विषयावरील विशेष ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील, उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात, डॉ. राजेंद्र खामकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 MAR 2026 लोकमत

# धोरणात्मक निर्णयांमध्ये सर्वेक्षणांची भूमिका महत्त्वाची : गीता सिंग राठोड

## अर्थमिती हीरकमहोत्सवी वार्षिक राष्ट्रीय परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शैक्षणिक संशोधनाबरोबरच शासकीय आणि संस्थात्मक धोरणात्मक निर्णयांसाठी विविध प्रकारची सर्वेक्षणे महत्त्वाची भूमिका बजावतात, असे मत केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या महासंचालक डॉ. गीता सिंग राठोड यांनी शनिवारी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त), भारतीय अर्थमिती संस्था आणि डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि टेक्नोलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अर्थमिती संस्था हीरकमहोत्सवी वार्षिक राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात त्या बोलत होत्या. भारतीय अर्थमिती संस्थेचे डॉ. नीरज हातेकर अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. उषा थोरात आणि प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील प्रमुख उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातील अर्थमिती परिषदेच्या सांगता समारंभात सांख्यिकी मंत्रालयाच्या महासंचालक डॉ. गीता सिंग राठोड यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. राठोड म्हणाल्या, रोजगार पद्धती, उद्योग गतिशीलता, औद्योगिक कामगिरी आणि गुंतवणूक वर्तन हे भारताच्या आर्थिक परिवर्तनाचे मुख्य प्रवर्तक घटक आहेत. ते नेमकेपणाने समजून घेण्याच्या कामी सर्वेक्षणे मदत करतात. सांख्यिकीय माहितीच्या आधारे आपणास कोणत्याही क्षेत्रातील विश्लेषण करता येते. नियोजन आणि प्रगतीसाठी त्याचा उपयोग होतो, असेही त्या म्हणाल्या. डॉ. उषा थोरात म्हणाल्या, १९९१ मध्ये रुपयाचे अवमूल्यन झाल्यामुळे देशाने आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आणि चलन व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल केले. तेव्हापासून देशाच्या अर्थव्यवस्थेने आपल्या प्रगतीचा वेग कायम राखला आहे. यावेळी डॉ. नीरज हातेकर, डॉ. महादेव देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले, तर भारतीय अर्थमिती संस्थेचे सचिव डॉ. के. षण्मुगन यांनी परिषदेचा आढावा सादर केला. संस्थेचे खजिनदार डॉ. प्रदीप्तरथी पांडा यांनी आभार मानले.

01 MAR 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# धोरणात्मक निर्णयांमध्ये सर्वेक्षणांची भूमिका महत्त्वाची

## डॉ. गीता सिंग-राठोड; विद्यापीठात राष्ट्रीय अर्थमिती परिषदेची सांगता



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित तीन दिवसीय राष्ट्रीय अर्थमिती परिषदेच्या सांगता समारंभात बोलताना सांख्यिकी मंत्रालयाच्या महासंचालक डॉ. गीता सिंग-राठोड. समवेत डॉ. प्रदीप्तरथी पांडा, डॉ. महादेव देशमुख, डॉ. उषा थोरात, डॉ. नीरज हातेकर. (छाया : नाज ट्रेनर)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शैक्षणिक संशोधनाबरोबरच शासकीय व संस्थात्मक धोरणात्मक निर्णयांसाठी विविध प्रकारची सर्वेक्षणे महत्त्वाची भूमिका बजावतात, असे मत केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या महासंचालक डॉ. गीता सिंग-राठोड यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभाग, भारतीय अर्थमिती संस्था व डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अर्थमिती संस्था हीरकमहोत्सवी राष्ट्रीय परिषद समारोप समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी भारतीय अर्थमिती संस्थेचे डॉ. नीरज हातेकर होते. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. उषा थोरात व प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. थोरात म्हणाल्या, १९९१ मध्ये रुपयांचे अवमूल्यन झाल्यामुळे देशाने आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये व चलन व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल केले. तेव्हापासून देशाच्या अर्थव्यवस्थेने प्रगतीचा वेग कायम राखला आहे. डॉ. महादेव देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. भारतीय अर्थमिती संस्थेचे सचिव डॉ. के. षण्मुगन यांनी परिषदेचा आढावा सादर केला. संस्थेचे खजिनदार डॉ. प्रदीप्तरथी पांडा यांनी आभार मानले.

### सर्वेक्षणांमुळे धोरणात्मक निर्णय अधिक प्रभावी

रोजगार पद्धती, उद्योग गतिशीलता, औद्योगिक कामगिरी व गुंतवणूक वर्तन हे भारताच्या आर्थिक परिवर्तनाचे मुख्य प्रवर्तक घटक आहेत. ते नेमकेपणाने समजून घेण्याच्या कामी सर्वेक्षणे मदत करतात. चांगले संशोधन चांगल्या डेटाच्या उपलब्धतेमुळे सुरू होते. मजबूत आकडेवारी हे भारताचे बलस्थान आहे. सर्वेक्षणांमुळे धोरणात्मक निर्णय देखील अधिक प्रभावी झाल्याचे दिसतात, असेही डॉ. राठोड म्हणाल्या.

0 1 MAR 2026

सकाळ

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# धोरणात्मक निर्णयांसाठी सर्वेक्षण महत्त्वाचे

## अंमलबजावणी मंत्रालय महासंचालक डॉ. गीता सिंग राठोड : राष्ट्रीय परिषदेचा समारोप

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २८ : 'शैक्षणिक संशोधनासह शासकीय आणि संस्थात्मक धोरणात्मक निर्णयांसाठी विविध प्रकारची सर्वेक्षणे महत्त्वाची भूमिका बजावतात', असे मत केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या महासंचालक डॉ. गीता सिंग राठोड यांनी आज व्यक्त केले.**

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त), भारतीय अर्थमिती संस्था आणि डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि टेक्नोलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अर्थमिती संस्था हीरक महोत्सवी वार्षिक राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. भारतीय अर्थमिती संस्थेचे डॉ. नीरज हातेकर अध्यक्षस्थानी होते. यावेळी रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर डॉ. उषा थोरात व प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. राठोड म्हणाल्या, 'रोजगार पद्धती, उद्योग गतिशीलता, औद्योगिक कामगिरी आणि गुंतवणूक वर्तन भारताच्या आर्थिक परिवर्तनाचे मुख्य प्रवर्तक घटक आहेत. ते नेमकेपणाने समजून घेण्याच्या कामी सर्वेक्षणे मदत करतात. चांगले संशोधन चांगल्या डेटाच्या उपलब्धतेमुळे सुरू होते. मजबूत आकडेवारी हे भारताचे बलस्थान आहे. सर्वेक्षणांमुळे धोरणात्मक निर्णयदेखील अधिक प्रभावी झाल्याचे दिसतात. सांख्यिकी तथ्ये देते, अर्थमिती आपल्याला स्पष्टता देते आणि एकत्रितपणे ते समाजाला सूज्ञपणे निवड करण्याचा आत्मविश्वास देतात. भारताला अशा तरुण विद्वानांची गरज आहे, जे तांत्रिक कौशल्य आणि सामाजिक उद्देशाची सांगड घालू शकतील. सांख्यिकीय माहितीच्या आधारे कोणत्याही क्षेत्रातील विश्लेषण करता येते.'



परिषदेच्या समारोपप्रसंगी बोलताना डॉ. गीता सिंग राठोड.

डॉ. थोरात म्हणाल्या, '१९९१ मध्ये रुपयाचे अवमूल्यन झाल्यामुळे देशाने आंतरराष्ट्रीय व्यापार व चलन व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल केले. तेंव्हापासून देशाच्या अर्थव्यवस्थेने प्रगतीचा वेग कायम राखला आहे.' यावेळी हातेकर, डॉ. महादेव देशमुख यांनीही मनोगत व्यक्त केले. भारतीय अर्थमिती संस्थेचे सचिव डॉ. के. षण्मुगन यांनी परिषदेचा आढावा सादर केला. संस्थेचे खजिनदार डॉ. प्रदीप्तरथी पांडा यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

0 1 MAR 2026



कराड : येथे आयोजित इतिहास परिषद राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात बोलताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण. समवेत प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील, डॉ. अवनीश पाटील, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, किशोर बेडकीहाळ आदी.

# समाजशास्त्राची जाणीव असलेल्या नेतृत्वाकडूनच समाज परिवर्तन

## माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण; कराडमध्ये शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे अधिवेशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

समाजात परिवर्तन घडविण्यासाठी समाजशास्त्राचे अध्ययन व इतिहासाचे सकारात्मक संशोधन या दोन बाबींच्या महत्त्वाची जाणीव असणारे नेतृत्व विकसित होण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद व कराड येथील सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २८ व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील होते. चव्हाण यांनी भाषणात समाजशास्त्र व इतिहास यांच्या परस्परसंबंधावर भाष्य केले. ते म्हणाले, सुजाण नेतृत्वाला समाजशास्त्राची जाण व भान असणे आवश्यक असते. त्यासाठी विद्यापीठे केवळ पदवीदानाची केंद्रे न राहता ज्ञाननिर्मितीची सक्रिय केंद्रे बनली पाहिजेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने इतिहास संशोधन अधिक व्यापक होण्याच्या दृष्टीने शासनाने स्वतंत्र संशोधन निधी निर्माण करणे आवश्यक आहेच; पण उद्योजकांनीही संशोधकांना आर्थिक पाठबळ देण्याची गरज आहे.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. पाटील म्हणाले, इतिहासकार विज्ञाननिष्ठ असला पाहिजे. इतिहासलेखनात वस्तुनिष्ठता, चिकित्सक दृष्टी आणि निर्भीडपणाही आवश्यक असून, इतिहास लेखन हे भावनांपेक्षा पुराव्यांवर आधारित असावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे अध्यक्ष डॉ. अवनीश पाटील, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ, ॲड. रवींद्र पवार, डॉ. संदीप महाजन, डॉ. सुनील जाधव, डॉ. सुरेखा पाटील, डॉ. अजित पवार उपस्थित होते. महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. अभयकुमार पाटील यांनी आभार मानले.

0 1 MAR 2026

जनप्रवास

# समाजशास्त्राची जाणीव असणाऱ्यांकडूनच परिवर्तन

**जनप्रवास : कोल्हापूर**

समाजात परिवर्तन घडविण्यासाठी समाजशास्त्राचे अध्ययन आणि इतिहासाचे सकारात्मक संशोधन या जाणीव असणारे नेतृत्व विकसित होण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी कराड येथे केले.

येथील शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद आणि कराड येथील सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २८ व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य डॉ. टी.एस. पाटील होते.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, मराठा इतिहास व्यापक समाजासमोर प्रभावीपणे मांडायचा असेल, तर मोडी कागदपत्रांचा शास्त्रशुद्ध अभ्यास अपरिहार्य आहे. तसेच आधुनिक



तंत्रज्ञानाच्या साहाय्याने इतिहास संशोधन अधिक व्यापक होण्याच्या दृष्टीने शासनाने स्वतंत्र संशोधन निधी निर्माण करणे आवश्यक आहेच, पण उद्योजकांनीही संशोधकांना आर्थिक पाठबळ देण्याची गरज आहे, असेही चव्हाण म्हणाले. अध्यक्षीय भाषण डॉ. टी. एस. पाटील यांनी केले. विद्यापीठ इतिहास परिषदेचे अध्यक्ष डॉ. अवनीश पाटील, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ, ॲड. रविंद्र पवार, डॉ. संदीप महाजन, सुनील जाधव, सुरेखा पाटील, अजित पवार, इतिहासाचे शिक्षक होते.

0 1 MAR 2026
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुजाण नेतृत्वाला समाजशास्त्राची जाण आवश्यक

## माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण : कराड येथे विद्यापीठ इतिहास परिषदेचे अधिवेशन

तरुण भारत अँकर

प्रतिनिधी

कोल्हापूर

सुजाण नेतृत्वाला समाजशास्त्राची जाण व भान असणे आवश्यक असते. त्यासाठी विद्यापीठे केवळ पदवीदानाची केंद्रे न राहता ज्ञाननिर्मितीची सक्रिय केंद्रे बनली पाहिजेत, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद व कराड येथील सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २८ व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील होते.


कराड येथील सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजमध्ये अधिवेशन झाले. समाजात परिवर्तन घडविण्यासाठी समाजशास्त्राचे अध्ययन आणि इतिहासाचे सकारात्मक संशोधन या दोन बाबींच्या महत्त्वाची जाणीव असणारे नेतृत्व विकसित होण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

### संशोधनाच्या नव्या वाटा खुल्या व्हाव्यात

माजी मंत्री पृथ्वीराज चव्हाण पुढे म्हणाले, संशोधनाच्या नव्या वाटा खुल्या झाल्या पाहिजेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने इतिहास संशोधन अधिक व्यापक होण्याच्या दृष्टीने शासनाने स्वतंत्र संशोधन निधी निर्माण करणे आवश्यक आहेच, पण उद्योजकांनीही संशोधकांना आर्थिक पाठबळ देण्याची गरज आहे. मराठा इतिहास व्यापक समाजासमोर प्रभावीपणे मांडायचा असेल, तर मोडी कागदपत्रांचा शास्त्रशुद्ध अभ्यास अपरिहार्य आहे.

डॉ. टी. एस. पाटील म्हणाले, इतिहासकार विज्ञाननिष्ठ असला पाहिजे. इतिहासलेखनात वस्तुनिष्ठता, चिकित्सक दृष्टी आणि निर्भीडपणाही आवश्यक असून इतिहास लेखन हे भावनांपेक्षा पुराव्यांवर आधारित असावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. अभयकुमार पाटील यांनी आभार मानले. यावेळी शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे अध्यक्ष डॉ. अवनीश पाटील, डॉ. चंद्रकांत खिलारे, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ, ॲड. रविंद्र पवार, डॉ. संदीप महाजन, डॉ. सुनील जाधव, डॉ. सुरेखा पाटील, डॉ. अजित पवार आदी उपस्थित होते.




शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास परिषदेत बोलताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण.

0 1 MAR 2026

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठे ज्ञाननिर्मितीची सक्रिय केंद्रे व्हावीत

## पृथ्वीराज चव्हाण यांचे प्रतिपादन

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** सुजाण नेतृत्वाला समाजशास्त्राची जाण आणि भान असणे आवश्यक असते. त्यासाठी विद्यापीठे केवळ पदवीदानाची केंद्रे न राहता ज्ञाननिर्मितीची सक्रिय केंद्रे बनली पाहिजेत. समाजात परिवर्तन घडविण्यासाठी समाजशास्त्राचे अध्ययन आणि इतिहासाचे सकारात्मक संशोधन या दोन बाबींच्या महत्त्वाची जाणीव असणारे नेतृत्व विकसित होण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी शनिवारी केले.

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद आणि कराड येथील सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २८ व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. समाजशास्त्र आणि इतिहास यांच्या परस्परसंबंधावर पृथ्वीराज चव्हाण यांनी भाष्य केले.




इतिहास परिषदेत मांडणी करताना पृथ्वीराज चव्हाण.

ते म्हणाले, आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने इतिहास संशोधन अधिक व्यापक होण्याच्या दृष्टीने शासनाने स्वतंत्र संशोधन निधी निर्माण करणे आवश्यक आहेच, पण उद्योजकांनीही संशोधकांना आर्थिक पाठबळ देण्याची गरज आहे. मराठा इतिहास व्यापक समाजासमोर प्रभावीपणे मांडायचा असेल, तर मोडी कागदपत्रांचा शास्त्रशुद्ध अभ्यास अपरिहार्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय मनोगतात निवृत्त प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील म्हणाले, इतिहासकार विज्ञाननिष्ठ असला पाहिजे. इतिहासलेखनात वस्तुनिष्ठता, चिकित्सक दृष्टी आणि निर्भीडताही आवश्यक आहे. इतिहास लेखन हे भावनांपेक्षा पुराव्यांवर आधारित असावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे अध्यक्ष डॉ. अवनीश पाटील, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ, ॲड. रवींद्र पवार, डॉ. संदीप महाजन, डॉ. सुनील जाधव, डॉ. सुरेखा पाटील, डॉ. अजित पवार, इतिहासाचे शिक्षक, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. डॉ. अभयकुमार पाटील यांनी आभार मानले.